# निर्माणता

राजयोगाद्वारे मनुष्याला काय प्राप्ती होते? जो पर्यंत मनुष्याला प्राप्ती दिसत नाही तो पर्यंत मनुष्याची कोणतेही कार्य करणय़ाची इच्छा होत नाही. आणि मनुष्य मग कोणत्याही प्रकारचे विविध कारणे सांगतो. परंतु मनुष्याला जेव्हा त्या कार्यापासून होणारी प्राप्ती समोर दिसते तेव्हा जरी मनुष्य हा असमर्थ असला तरी सर्व सामर्थ्य एकवटून ते कार्य पूर्ण करण्याचा पर्यंत करतो. त्यामुळे प्रत्येक कार्यापासून  होणारी प्राप्ती माहिती असणे आवश्यक आहे. तेव्हा प्रश्न  असा आहे की, राजयोगापासून आपल्या जीवनात होणारा लाभ कोणता? भगवतांचे ध्यान केल्याने काय प्राप्त होते? राजयोगाने व्यवहारीक जीवनात अनेक प्राप्ती होतात गृहस्थ जीवन तर प्रत्येक व्यक्ती जगत असतो परंतु ते जगताना मानसिक संतुलन व्यवस्थित नसेल तर काहीही प्राप्त करता येत नाही. मानसिक संतुलन बिघडलेल्यांना तर समाज देखील आपलेसे करीत नाही. हे मानसिक संतुलन व्यवस्थित राखण्यात राजयोगाचा फार  फायदा होतो.

दुसरी गोष्ट म्हणजे केवळ व्यावहारिक कुशलता असून भागत नाही तर संतुलन आणि कुशल व्यवहाराची आवश्यकता असते. मनात सुद्धा एकाग्रता असेल तर त्यामुळे कार्य करण्याची शक्ती येते व विश्वास निर्माण होतो अशा अनेक प्राप्त्या आहेत. ज्यांची आवश्यकता वर्तमान जीवनात आहे आणि ते राजयोगाद्वारे प्राप्त होतात. आज बदललेल्या लाईफ स्टॉईलमुळे मनुष्य छोट्या-छोट्या  गोष्टीत उत्तेजीत होतो आणि क्रोध करतो की, ज्यामुळे काम होत नाही आणि नंतर पश्चाताप करतो की, मी अजून थोडे सहन केले असते तर ते काम पूर्ण झाले असते. आणि अशा अनेक प्रकारची जाणीव त्याला होऊ लागते.

राजयोगाद्वारे आपल्याला आपल्या जीवनाचा आधार स्तंभ असलेल्या मुख्य़ अष्ट शक्तीची प्राप्ती होते. ज्यांची व्यावहारिक जीवन, सामाजिक जीवन, पारिवारीक जीवन व व्यावसायिक जीवनात आवश्यकता असते. याच अष्ट शक्तीचे प्रतीक म्हणून देवीला अष्ट पुजा दाखविल्या जातात. तर डोके, शीश हे अहंकाराचे प्रतीक असल्याने रावणाला दहा तोंडे दाखविले जातात. ज्यावेळी एखाद्याला सहयोग दिला जातो. एखाद्या कार्यात योगदान दिले जाते. तेव्हा त्याचे प्रतीक म्हणून हात दाखविला जातो म्हणूनच भुजा हे मदतीचे सहयोगाचे प्रतीक  आहे त्याचप्रमाणे या अष्ट शक्तीयॉ आपल्या सहयोगी बनल्याने आपले जीवन देखील संतुष्ट व प्रसन्न होते.

अष्ट शक्तीमध्ये सर्वात पहिली शक्ती आहे ती म्हणजे सहनशक्ती होय ही शक्ती तर आहे पण सहनशीलता हा गुण देखील आहे. या शक्तीमुळे आपल्या जीवनामध्ये विश्वास निर्माण होतो. सहनशीलता □ सहन□ शील, शील म्हणजेच चारित्र्य जी व्यक्ती सहन करते तिचे चारित्र्य नेहमीच उंच असते. जर काही महान लोकांचे चारित्र्य पाहिले तर त्याच्यामध्ये सहनशीलतेचा गुण फार महत्वाचा होता. सहनशीलतेचा गुण इतकी शक्ती निर्माण करतो की, त्यांच्यापुढे मोठेमोठे अंहकारी व्यक्तीही नतमस्तक होतात. जेव्हा एखादी मुर्ती निर्माण केली जाते तेव्हा त्या मुर्तीला किती तरी छन्नी व हातोड्याने घाव सहन करावे लागतात. परंतु जेव्हा मुर्ती पुर्ण तयार होते तेव्हा त्यावर फुले चढविली जातात. यावरुनच एका विश्वमित्र व वसिष्ठ ऋषी यांच्या गोष्टीची आठवण झाली. एकदा वसिष्ठ ऋषी आपल्या आश्रमात असताना विश्वमित्र त्यांना भेटण्यासाठी आले व जेव्हा विश्वमित्र  तिथे पोहोचले तेव्हा वसिष्ठ ऋषीनी त्यांचे स्वागत

करताना म्हटले की, यावे राजर्षि यावे.... परंतु विश्वमित्रांना आपण ब्रम्हर्षी असल्यांचा फार अभिमान होता. तसेच वसिष्ठ ऋषींनी त्यांना राजर्षी म्हटल्याने विश्वमित्रांना राग आला व ते तेथून उठून बाहेर आले तेव्हा वसिष्ठ ऋषीची दोन लहान मुले बाहेर खेळत होती. त्यावेळेस विश्वमित्राने रागाच्या भरात त्या दोन्ही मुलांचा शिरेच्छेद केला. या घटनेचा वसिष्ठ ऋषीवर काय परिणाम घडून येतो हे पाहण्यांच्या उद्‌देशाने  ते तेथेच एका झुडूपाच्या पाठीमागे लपून बसले. त्यानंतर वसिष्ठ ऋषींनी अगदी शांतपणे आपल्या मुलांवर अंत्य्संस्कार केले व ते परत येऊन बसले, ती पौर्णिमेची रात्र होती. चंद्राचा प्रकाश पाहुन ते आपल्या पत्नीला म्हणाले की, आज पौर्णिमेच्या रात्री पडलेल्या चंद्राच्या प्रकाशात एक वेगळेच तेज दिसत आहे, असे वाटते की, या प्रकाशात विश्वमित्राच्या तपस्येचे तेज सामावलेले आहे. जेव्हा विश्वमित्रांनी वसिष्ठ ऋषींचे हे वाक्य ऐकले व त्यांना कळून चुकले की, वसिष्ठ ऋषींनी माझी तुलना चंद्राच्याय तेजोमय प्रकाशाशी केली तेव्हा त्यांना पश्चाताप झाला आणि ते झुडपातून बाहेर येऊन त्यांनी वसिष्ठ ऋषींचे पया धरले तेव्हा वसिष्ठ ऋषींनी  त्यांना उठविले व म्हटले, यावे ब्रम्हर्षी यावे.....! त्यावेळेस विश्वमित्र उभे राहिले व म्हणाले, हेच शब्द आपण पहिल्यांदाय म्हटले असते तर माझ्याकडून हे पाप कर्म झाले नसते.  त्यावेळेस वसिष्ठ ऋषी  हसत म्हणाले की, विश्वमित्रा आपण जेव्हा पहिल्यांदा येथे आलात तेव्हा आपण राजर्षी होता कारण तेव्हा आपण अहंकारात आला होता. परंतु आता आपण आलात तेव्हा आपल्यात निर्माणता आहे. आणि याच निर्माणतेमुळे आपण ब्रम्हर्षी झाला आहात. व्यक्तीमध्ये जोपर्यंत अभिमान असतो तोपर्यंत त्याला जाणीव होत नाही आणि जेव्हा त्याच्यामध्ये निर्माणता येते तेव्हा तो व्यक्ती महान बनतो. परंतु ही निर्माणता आणण्याकरीता आवश्यक आहे तो निमित्य भाव जेव्हा मोठ-मोठ्या महान पुरुषांनी सहनशीलतेचा गुण  धारण केला तेंव्हा त्यांच्या जवळ दुसऱ्यांना नमविण्यांची शक्ती आणि त्यामुळे त्यांच्या महानतेचे गायन आहे.

सहनशक्ती हीच महानतेचा आधार आहे.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com